महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८६ वा | दिनांक : १४/०९/२०२५ | वार : रविवार

## मराठा आरक्षणावर उच्च न्यायालयात सुनावणी : दोन आरक्षणातील कोणते ठेवणार?

**मुंबई :** मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाबाबत मुंबई उच्च न्यायालयात आज महत्त्वपूर्ण सुनावणी सुरू आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या न्याय पीठासमोर आरक्षणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर दिवसभर युक्तिवाद झाला. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑक्टोबरला होणार आहे.

सुनावणीदरम्यान न्याय पीठाने राज्य सरकारला थेट विचारणा केली की, "सध्या मराठा समाजाला दोन प्रकारची आरक्षणे उपलब्ध असल्याचे दिसते. मग सरकारने यापैकी कोणते कायम ठेवायचे याबाबत निर्णय घेतला आहे का?" असा प्रश्न उपस्थित झाला. न्यायालयाच्या या थेट प्रश्नामुळे राज्य सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले.

सरकारच्या वतीने युक्तिवाद करताना, काही पात्र मराठा समाजातील लोकांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सरकारी वकिलांनी स्पष्ट केले की, हैदराबाद गॅझेटच्या आधारे पात्र मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी म्हणून नोंदविण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे अशा लोकांना ओबीसी आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे.

आरक्षणाचा गुंता वाढला

मराठा समाजाला स्वतंत्रपणे दिलेल्या १० टक्के आरक्षणाव्यतिरिक्त, कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना ओबीसी आरक्षणाचाही मार्ग खुला करण्यात आला आहे. त्यामुळे न्यायालयाने उपस्थित केलेला 'दोन आरक्षण' या मुद्यावरून कायदेशीर आणि सामाजिक वाद वाढण्याची चिन्हे आहेत. याचिकाकर्त्यांच्या बाजूने मांडण्यात आले की, राज्य सरकारने आरक्षणाचा हा दुहेरी लाभ रोखला नाही, तर इतर मागासवर्गीय समाजांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष उसळण्याची शक्यता आहे.

विरोधकांचा असा युक्तिवाद आहे की, ओबीसींसाठी असलेला स्वतंत्र आरक्षणाचा कोटा धोक्यात येऊ शकतो. कारण मराठा समाजाची संख्या मोठी असल्याने त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर आरक्षणाचा वापर केला जाऊ शकतो आणि त्यामुळे मूळ ओबीसी घटकांना अन्याय होईल.

सरकारची भूमिका आणि न्यायालयाचे निरीक्षण

सरकारकडून सादर करण्यात आलेल्या भूमिकेत सांगण्यात आले की, राज्यातील कुणबी म्हणून नोंद होऊ शकणाऱ्या पात्र मराठा समाजातील घटकांना तशी प्रमाणपत्रे दिली जातील. यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, एकीकडे तुम्ही मराठ्यांना १० टक्के स्वतंत्र आरक्षण दिले आहे आणि दुसरीकडे त्यांना ओबीसी आरक्षणाचाही मार्ग खुला करून दिला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा कायदेशीर अडचणी निर्माण होतील. खंडपीठाने यावर भर दिला की, आरक्षणाचा दुहेरी लाभ देता येणार नाही. सरकारने स्पष्टपणे सांगावे की, मराठा समाजासाठी नेमकी कोणती धोरणात्मक भूमिका ठरवली आहे.

मराठा आरक्षणाबाबतच्या पुढील घडामोडींना गती

या सुनावणीत न्यायालयाने स्पष्ट प्रश्न विचारल्यानंतर आता राज्य सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठा समाजाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चिघळलेला असून, त्यावर विविध आयोग, समित्या आणि कायदेशीर प्रक्रियेतून उपाय शोधले जात आहेत. मात्र, अद्यापही अंतिम तोडगा निघालेला नाही. आजच्या सुनावणीमुळे मराठा आरक्षणाबाबतच्या पुढील घडामोडींना गती मिळेल, असे दिसते. पुढील काही दिवसांत सरकारची भूमिका आणि न्यायालयाचे आदेश यावरून राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.




## पंतप्रधान मोदींकडून देशभक्तीचा व्यापार : उद्धव ठाकरे



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी भारत-पाक क्रिकेट सामन्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर तिखट हल्ला चढवला. पहलगाम हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीयांचे रक्त अजून सुकले नाही. त्यांचे घाव भरले नाहीत. पण त्यानंतरही केंद्र सरकार पाकशी क्रिकेट खेळून देशभक्तीचा व्यापार करत आहे, असे ते म्हणालेत.

उद्धव ठाकरे शनिवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आज एका उद्विग्न भावनेतून व विषन्न मनाने मी तुमच्याशी बोलत आहे. उद्या अबूधाबीत भारत-पाक क्रिकेट सामना आहे. अजूनही पहलगाम हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीयांचे रक्त सुकले नाहीत. त्यांचे घाव भरले नाहीत. त्यानंतर भारतीयांना वाटले होते की, आपण आता पाकला जागेवर ठेवणार नाही. त्याचे दोन-तीन तुकडे करून टाकू. त्या दृष्टीने एक चढाई व युद्धही केले गेले. त्याला ऑपरेशन सिंदूर असे नाव ठेवण्यात आले. मधल्या काळात आपल्या संरक्षणमंत्र्यांनी हे ऑपरेशन अजूनही सुरू असल्याचे सांगितले. एकूणच ते जे काही वातावरण होते, ते आपल्यासाठी नव्हते. कारण, काही दिवसांनी किंवा वर्षांनी पाक आपल्या देशात अतिरेकी हल्ले करतो. त्यावेळी आपण सर्वजण जागे होतो. सरकारही चवताळून उठतो.

आपले सैनिक दरवेळी शौर्य गाजवतात. यावेळी तर आपण पाक पादाक्रांत करत असल्याचे चित्र होते. आपल्या सैनिकांनी शौर्याची पराकाष्ठा केली होती. पण अचानक अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवल्याची घोषणा केली. व्यापारासाठी युद्ध थांबवल्याचे ते म्हणाले. त्याच सुमारास भालाफेकीत भारताचे नाव उज्ज्वल करणाऱ्या नीरज चोप्राने एका पाकिस्तानी प्रशिक्षकाला भारत भेटीचे निमंत्रण दिले होते. तो प्रशिक्षक आला नाही. पण त्या नीरज चोप्रावर अंधभक्तांनी देशद्रोही असल्याची टीका केली होती. त्यावेळी त्याच्यावर काय बेतले असेल त्याची मला कल्पनाही करवत नाही.

पण आता आपण ज्या पाकबरोबर युद्ध पुकारले होते, त्याच पाकशी उद्या क्रिकेट खेळणार आहोत. आज असे अचानक काय झाले? ऑपरेशन सिंदूरनंतर जगभरात मोदींनी सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवले होते. त्यातून भारताची लढाई पाक पुरस्कृत दहशतवादाशी असल्याचा संदेश दिला होता. आता त्यांना नेमके काय झाले? ही देशभक्तीची थट्टा आहे. थट्टाच नव्हे तर देशभक्तीचा हा व्यापार आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, या लोकांना व्यापारापुढे देशाचीही काही किंमत राहिली नाही. राजनाथ सिंह व अमित शहा यांनी आता पाकबरोबरचे युद्ध थांबवल्याची घोषणा करावी. विशेषतः नीरज चोप्रा व लष्करी अधिकारी सोफिया कुरेशी यांच्यावर टीका करणाऱ्या भाजपच्या अंधभक्तांचे व गधड्यांचे काय करणार? पाकवरील आपली भूमिका काय आहे? हे सांगावे. तुम्ही सांगाल तेव्हा पाक मुर्दाबाद म्हणायचे, तुम्ही पाकला मिठ्या मारणार आणि तिकडे जवान शहीद होणार. हे चालणार नाही. अतिरेक्यांनी तेव्हा भारतीय नागरीकांना धर्म विचारून गोळ्या घातल्या. आता भाजप व मोदींच्या लेखी हिंदुत्वाची काही किंमत आहे की नाही? हिंदुत्व व देशापेक्षाही त्यांना आज व्यापार मोठा वाटत आहे काय?

उद्धव ठाकरे म्हणाले, एखाद्या खेळावर आपण बहिष्कार टाकल्यामुळे कोणतेही जागतिक संकट येत नाही. यापूर्वीही अनेकदा अशा घटना घडल्या आहेत. पंतप्रधानांना जगभरात शिष्टमंडळ पाठवून जे जमले नाही, ते आपल्याला या एका सामन्यावर बहिष्कार टाकून जमले असते. पाक जोपर्यंत भारतविरोधी कारवाया थांबवत नाही, तोपर्यंत पाणीच काय पाकसोबत कोणतेही संबंध ठेवणार नाही असे ठणकावून सांगता आले असते. शिवसेनाप्रमुखांनी पाक क्रिकेटपटू जावेद मियांदादला असेच ठणकावून सांगितले होते.

आज सरदार पंतप्रधान हवे होते. ते असते तर आज पाक शिल्लक राहिला नसता आणि त्याच्यासोबत क्रिकेट खेळण्याचा प्रश्नही राहिला नसता. उद्या शिवसेनेच्या वतीने राज्यभरात निषेध व्यक्त केला जाईल. ऑपरेशन सिंदूनंतर भाजपवाले हर घर सिंदूर मोहीम राबवणार होते. त्यांची ती मोहीम फसली. आता मोदींना हर घरसे सिंदूर मोदींना पाठवला जाईल. उद्या रविवार आहे. उद्या सकाळी राज्यभर शिवसेनेच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या शहरातील प्रमुख चौकात जमतील. सर्वजण सिंदूराच्या पुड्या एका मोठ्या डब्यात टाकतील. त्यानंतर हे सर्व डबे पोस्टाच्या माध्यमातून पंतप्रधान मोदींना त्यांच्या कार्यालयात पाठवले जातील.

उद्धव ठाकरे म्हणाले, दरवेळी भारत-पाकचा सामना असतो तेव्हा काही मिनिटांतच तिकीट विक्री होत होती. पण यावेळी या सामन्याला अजूनही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. मग मला मोदींना प्रश्न विचारायचा आहे की, उद्या जय शहासह तुमच्या बाजूला बसेलेले सर्व आंडू-पांडू लोक उद्या तिकडे गेल्यानंतर त्या सर्वांना नीरज चोप्रासारखे देशद्रोही म्हणणार का? जे लोक हा सामना पाहण्यासाठी जातील ते सर्वजण देशद्रोही असतील का? टीव्हीवर सामने पाहणाऱ्यांनाही देशद्रोही म्हणणार का? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती यावेळी उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी व भाजपवर निशाणा साधताना केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ सप्टेंबर २०२५


## अमर आहे

भेदभाव या भूमीवरती
खोटे धर्म धूर्तांची चलती
सागरावरूनी अरबी घोडे
दौडत आली भारताकडे
समतेची प्रिय लहर आहे
मुसलमान समर आहे

खोटा धर्म सोडा रे आता
खऱ्या धर्माच्या मारू बाता
कुराण दिले सर्वांच्या हाती
देव भेटला फुगली छाती
अल्ला तो एक ईश्वर आहे
मुसलमान अमर आहे

दिल्लीची तखते सजवली
चळवळ सुफीची हिंदवली
गोरगरिबाला दिला न्याय
इस्लाम ठरला दुधाची साय
खवय्याला आता बहर आहे
मुसलमान समर आहे

चोहीकडे हिंदुस्थान नाव
इंग्रजाचा ओळखला डाव
बोला इन्कलाब जिंदाबाद
देश केला आम्ही आझाद
शहिदांचा हा गजर आहे
मुसलमान अमर आहे

लोकशाही संविधानासाठी
सर्वदा उभा सत्याच्या पाठी
मुस्लिमांचे भलेपण पहा
तत्पर संकटमोचक हा
हिरवळीला का मर आहे !
मुसलमान अमर आहे
मुसलमान समर आहे

**शफी बोल्डेकर,**
**संस्थापक, ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था. बोलडा, ता.कळमनुरी, जि. हिंगोली.**
**मो. ७७९८९६७७९३**

# निर्णय प्रक्रियेत डिजिटल डेटा हा हिऱ्यासारखा मौल्यवान : डॉ. गरिमा सिंग



**जालना :** १३: डिजिटल युगात डेटा हा निर्णयप्रक्रियेतील हिऱ्यासारखा मौल्यवान घटक आहे असे सांगून फिनटेक क्षेत्रातील क्रांतिकारक बदल, विशेषतः यूपीआय पेमेंट प्रणालीमुळे बँकिंग सेवा सर्वसामान्यांच्या बोटांच्या टोकांवर आले असले तरी तंत्रज्ञानासोबतच वाढत्या फसवणुकीचे धोकेही वाढले आहे. त्याची काळजी आपण घेतली पाहिजे असे प्रतिपादन डाटा सायंटिस्ट डॉ. गरिमा सिंग यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात कौशल्य विकास समितीच्या वतीने "डेटा अनालिटिक्स टूलबॉक्स : पॉवरिंग इनसाइट्स अक्रॉस इंडस्ट्रीज" या विषयावर अभिनव इन्स्टिट्यूट मुंबईच्या डॉ. गरिमा सिंग यांचे प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.कौशल्यांची वाढती मागणी असलेल्या सात महत्त्वाच्या क्षेत्रांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. यात एक्सेल, पायथॉन, लॉजिस्टिक्स, सप्लाय चेन मॅनेजमेंट, आरोग्यसेवा (जनरल ड्युटी असिस्टंट), सेमीकंडक्टर इंडस्ट्रीज आणि फायनान्शिअल टेक्नॉलॉजी या क्षेत्रांचा समावेश होता. डॉमिनोजच्या सप्लाय चैनपासून मायक्रोसॉफ्टच्या प्रगतीपर्यंत अनेक उदाहरणे देत त्यांनी या क्षेत्रातील संधी स्पष्ट केल्या. विद्यार्थ्यांनी केवळ एक्सेलपुरते मर्यादित न राहता पायथन, SQL, Power BI, मशीन लर्निंग व बिग डेटा हँडलिंग यांसारखी साधने आत्मसात करण्याचे आवाहन करून संवाद कौशल्य, सादरीकरण क्षमता व AI साधनांचा योग्य वापर यांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले तसेच, "विक्रम ३२" सारख्या सेमीकंडक्टर नवकल्पना उद्योग जगताला नव्या उंचीवर नेत आहेत, कौशल्य विकास ही काळाची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.भूषण नाफडे, कौशल्य विकास समितीचे प्रा. संदीप पाटील, डॉ. निलेश बर्डे, डॉ.ओम चव्हाण यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन प्रा. विलास भुतेकर यांनी केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला. यावेळी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# बेरडवाडी शाळेत शिक्षकांना निरोप - नूतन शिक्षकांचे जल्लोषात स्वागत



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** बेरडवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भव्य व उत्साहपूर्ण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात बदली झालेल्या शिक्षकांना भावपूर्ण निरोप देण्यात आला तर नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचे फुलांची उधळण करून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेचे माजी मुख्याध्यापक अनिल मुडमे तसेच सहशिक्षक सुनिल राठोड, बालाजी भालेराव, युवराज चव्हाण व सहशिक्षिका रंजना तांदळे यांची दुसऱ्या शाळेत बदली झाल्याने त्यांना शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन भावपूर्ण निरोप देण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा विशेष गौरव करण्यात आला. त्यानंतर नव्याने रुजू झालेल्या खंडू वाकळे, कमलाकर सोमवंशी, गणपत राठोड, मोहन कांबळे व तनुजा कांबळे या शिक्षकांचे गावकऱ्यांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतराव मंडले होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष रंजितकुमार भोकले, उपसरपंच दशरथ मंडले, ग्रामसेवक निकम साहेब, कृषी सहाय्यक पाटील साहेब उपस्थित होते.

तसेच शिवशंकर माळी, दत्ता कोळी, मल्लिनाथ कांबळे, चंद्राम मंडले, गोविंद व्यंकट मंडले, शिवशंकर मंडले, हणमंत भोकले, कल्लेश्वर मंडले, श्रीमती रंगुबाई वासुदेव, सपना मंडले, भाग्यश्री वासुदेव, ज्योती भोसले, भालचंद्र मंडले, कन्हैय्या भोकले, पांडुरंग वासुदेव, गोपाळ वासुदेव, रायप्पा शिवपाटील, निगन्ना वासुदेव, भीमाबाई मंडले, युवा प्रशिक्षणार्थी राधिका जमादार, धनराज वासुदेव,पंडित भोसले मु अ शेके सर आदींची उपस्थिती होती. या सोहळ्यातून एकीकडे निरोपामुळे डोळ्यांत अश्रू तर दुसरीकडे स्वागतामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीमुळे शाळेच्या इतिहासातील हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. सुत्रसंचालन मोहन कांबळे यांनी तर आभारप्रदर्शन मु अ खंडू वाकळे यांनी केले


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ सप्टेंबर २०२५


## पीएम श्री केसरजवळगा या शाळेत नुतन शिक्षकांचे स्वागत व विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात साजरा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत लेझीम-डोलताशांच्या गजरात व फुलांची उधळण करत शाळेत नुकतेच रुजू झालेले श्री. संजीव भोसले सर व श्री. सुनिल राठोड सर यांचे दिमाखदार स्वागत-सत्कार करण्यात आले. या विशेष प्रसंगी संपूर्ण शाळा आनंदोत्सवाने निनादली. याच वेळी तालुकास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून शाळेचा मान वाढविणाऱ्या कु. आशीष सोनकांबळे हिचा शाळेच्या वतीने विशेष सन्मान करून तिचे अभिनंदन करण्यात आले. 'कल करे सो आज कर, आज करे सो अब , पलमे प्रलय होजयेगा बहुरी करेगा कब' म्हणत शाळेची गुणवत्ता आज ज्या परिस्थितीत आहे त्यापेक्षा वरच्या लेव्हल ला घेऊन जाऊ असे प्रतिपादन नूतन शिक्षक सुनिल राठोड यांनी केले. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजिज शेख, उपसरपंच जयपालसिंग राजपूत, माजी सरपंच अमोल पटवारी, तंटामुक्ती अध्यक्ष शिवशंकर कणमुसे, उपाध्यक्ष बिरबलसिंग राजपूत, शा.व्य.स. सदस्य बालाजी डिगोळे, इंद्रजीत लोखंडे तसेच पालक वर्ग उपस्थित होते. या सोहळ्यातून शिक्षकांना प्रोत्साहन, विद्यार्थ्यांना प्रेरणा व शाळेच्या शैक्षणिक वातावरणाला नवी ऊर्जा लाभल्याचे समाधान सर्व मान्यवरांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन भोसले बालाजी यांनी तर आभार अजीज शेख यांनी मानले..

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** दि. १३)येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उद्या दि. १४ सप्टेंबरला रविवार असल्याने आजच हिंदी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती ए. एस. गुमास्ते आणि प्रमुख वक्ते म्हणून श्री. एम. बी. गोंड यांची उपस्थिती होती. या प्रसंगी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कविता , भाषणे, गिते, नाटीका आदी कार्यक्रम सादर केले. तसेच या नंतर प्रमुख वक्ते श्री. गोंड यांनी हिंदी भाषेचा इतिहास सांगितला. प्रमुख पाहुण्या श्रीमती गुमास्ते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी मुख्याध्यापक श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप करताना हिंदी भाषेचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. मयुर नेवरे व प्रेम आव्हाड यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. रुद्राणी राऊळ व गायत्री बरकसे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. द्वारा - रमाकांत छडीदार छ.संभाजी नगर

# आठवणी... त्या निवडणुका

**मी** आठवीला गेलो. त्या वर्षी गणित हा विषय बीजगणित व भूमिती या दोन रुपात मला सतावण्यासाठी हजर झाला.या दोन्ही विषयांना वेगवेगळे शिक्षक होते. आता दोन्ही विषयाचे वर्गपाठ व गृहपाठासाठी वेगवेगळ्या वह्या घेण्याइतकी परिस्थिती नव्हती.इथं फाटेलतुटेल पुस्तकं निम्म्या किंमतीत कसेतरी मिळत होते;तिथं प्रत्येक विषयाला दोन-दोन वह्या घेणे शक्यच नव्हते.आता असं वाटू लागलं होतं की गणित भंडावून सोडतंय. सातवीपर्यंत बेरीज, वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार शिकलो होतो.त्या वेळी गणिताचा सराव पाटीवर केला होता म्हणून जास्त वह्यांची गरज भासत नव्हती.आता मोठमोठे गणितं पाटीवर करणं शक्य नव्हते व इतक्या वह्या आणणे ही शक्य नाही मग करायचं काय हा यक्षप्रश्न होता.त्यातल्या त्यात पुन्हा घरी गणिताचा सराव करावा लागणार कारण हा विषय पाठांतर करून सोडवणे शक्य नव्हते. आता सराव केल्याविना पास होणे शक्य नाही हे कळून चुकले अन् तेव्हा कुठं काठावर पास होण्याइतके मार्क मिळणार होते. एका रविवारी खडड्याच्या रस्त्याने धुरळा उडवीत बगळ्यांना लाजवील इतके सुंदर पांढरेशुभ्र कपडे घातलेले, कपड्यावर एक ही डाग नसलेले लोकं भारी जीप गाड्यात बसून आले.त्यांच्या सोबतच अजून चार- पाच जण साध्या जीपमध्ये बसलेले होते ते "ताई माई आक्का विचार करा पक्का" "येऊन येऊन येणार कोण" "गली गली मे शोर है" अशा बऱ्याच घोषणा देत गल्ली बोळात फिरत होते. सर्वांना लहान मोठे पॉम्प्लेट वाटत होते.नेमकं काय झालं हे आम्हा मुलांना कळत नव्हतं. निवडणुका आल्या म्हणून हे लोकं मतदान मागण्यासाठी आले असे गावातील ज्येष्ठ माणसं सांगू लागले. या निमित्ताने का होईना आम्हाला गाडीबैलात बसणाऱ्या मुलांना आयुष्यात जीप गाडी पाहण्याचे भाग्य लाभले.आम्ही मुलं आता त्यांच्या मागे मागे फिरून ते वाटत असलेले कागदं हौसेने गोळा करू लागलो अन् क्षणात विचार आला की या कागदांच्या पाठीमागील बाजू कोरी आहे.त्यामुळे पाठीकडील बाजूला कोरे असलेले हे कागदं गणिताचा सराव करण्यासाठी उपयोगी पडतील म्हणून मी अजून ते पॉम्प्लेट गोळा केले. आता मारुतीच्या मंदिरासमोर गावातील लोकं गोळा झाली होती व ते पुढारी लोकं ही तिथे होते.खरंतर त्या लोकांनी गावातील माणसांना गोळा केले होते.आता त्यातील एका पुढाऱ्याने बोलायला सुरुवात केली.त्या बोलण्याला भाषण म्हणतात हे नंतर समजले. त्यांनी भाषणात सांगितले की आता निवडणूक लागली असून मी निवडून आलो की आपल्या गावात वीज, रस्ते, शाळा, बँक, पोस्ट ऑफिस,नळाने पाणीपुरवठा असं बरंच काही देईल.आता ते काय देणार हे माहीत नव्हते. कारण गावाला अनेक युगापासून रस्ता माहित नव्हता. वीज कशाला म्हणतात हे ही माहीत नव्हते.नळाचा तर प्रश्नच नव्हता कारण गावातील सार्वजनिक विहिरीतून बादलीने पाणी ओढून डोक्यावर हंडा घेऊन ते पाणी घरी आणण्यात गावातील मायबाहिनीच्या अनेक पिढ्या खपल्या होत्या.अन् पैसे पाहायला मिळत नव्हते म्हणून बँकेची ही गरज नव्हती.अन् साक्षरता कमी असल्याने पोस्ट हा विषय ही महत्त्वाचा घटक वाटत नव्हता.त्या काळी नातेवाईकाच्या मौतीची खबर सायकल स्वार येऊन सांगत असे. तसेच पंचक्रोशीतील बाजारपेठेच्या बोलठाण या गावी आठवडी बाजारात अमुक अमुक नातेवाईकाचे निधन अमुक दिवशी झाले असून दहाव्याचा दिवस अमुक दिवसी राहील हे सांगितल्या जात असे. तसेच सोयरिकीचे कामं ही या दिवशी बऱ्याच प्रमाणात होत असे. वर आश्वासन दिल्याप्रमाणे वीज, शाळा, रस्ते, पोस्ट, बँक गावाला आज ना उद्या मिळेल ही आशा या निमित्ताने गावकऱ्यांना लागल्याने गावकरी खुश झाले व मला गणिताचा अभ्यास करण्यासाठी कोरे पाने मिळाली व यामुळे माझ्या गणिताच्या प्रॅक्टिसचा प्रश्न सुटला म्हणून मी खुश झालो. आता ते सर्व कागदं गोळा करून लहान मोठे अलग केले.घरी गोधडी शिवण्याचा सुईदोरा होता.तो सुईदोरा घेऊन लगेच दोन रफ वह्या तयार केल्या.त्या नंतर दहावी पास करेपर्यंत अशा प्रकारे वह्या बनवून गणिताची प्रॅक्टिस करून कसंतरी गणितापासून पिच्छा सोडवला. त्या वेळी मला असं वाटायचं की या निवडणुका रोज व्हाव्या कारण मला अभ्यासासाठी किमान कागदं तरी फुकटात मिळायचे अन् माझा गणिताचा अभ्यास नीट व्हायचा व मी प्रत्येक वर्षी चांगल्या मार्कांने पास व्हायचो.


**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो..९४०३३८४८८९**



Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ सप्टेंबर २०२५


## पाठ्यपुस्तकातील लेखकाला प्रत्यक्ष पाहून शाळेतील विद्यार्थी भारावले



**छत्रपती संभाजीनगर :** समाजामध्ये साहित्यिकांची भूमिका महत्त्वाची असून मनाला उभारी देण्याचे काम साहित्यातून केले जाते असे प्रतिपादन शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी केले.माजी सैनिक माधवराव खुटे यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त 'पाठ्यपुस्तकातील प्रत्यक्ष लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला' या उपक्रमांतर्गत बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील 'रोपटे' इयत्ता तिसरी या पाठाचे प्रत्यक्ष लेखक गेणू शिंदे यांच्या मुलाखतीचे आयोजन रायझिंग स्टार माध्यमिक विद्यालय हर्सुल येथे शुक्रवारी, दि 12 रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाष निकम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कवी मनोज खुटे यांनी केले. गेणू शिंदे यांची मुलाखत शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी घेतली. शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची दिलखुलासपणे उत्तरे दिली. पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. यावेळी प्राचार्य संजय गायकवाड, जि. प. उपाध्यक्ष एल.जी गायकवाड, जी.एस. गायकवाड, प्रा.आर. एन. गायकवाड,किरण निकम,बाळु खुटे, अतुल निकम, शिवाजी गायकवाड, किरण राऊत, सोमीनाथ गायकवाड, मुख्याध्यापिका दिपाली वाकळे,स्वाती नलावडे आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन अंकुश मोकासे यांनी केले.

## एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे म्हणुन बंजारा तरुणाची आत्महत्या



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुक्यातील नाईक नगर तांडा येथील एका ३२ वर्षीय तरुणाने बंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेट नुसार एस.टी.प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची धक्कादायक घटना दि.१३ सप्टेंबर रोजी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. सविस्तर वृत्त बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण द्यावे, या मागणीसाठी उमरगा तालुक्यातील नाईक नगर येथील 32 वर्षीय पवन गोपीचंद चव्हाण या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी (दि. 13 सप्टेंबर) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली.चव्हाण यांच्या खिशात सापडलेल्या चिठ्ठीत “मा. मुख्यमंत्री साहेब, बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट प्रमाणे अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण द्या” असा मजकूर लिहिलेला आढळून आला आहे.पवन चव्हाण हे बी.कॉम तृतीय वर्षापर्यंत शिक्षण घेतलेले होते. त्यांच्या मागे पत्नी रूपाली, तीन वर्षांचा मुलगा रुद्र, पाच वर्षांची मुलगी रितिका आणि आई द्रौपदाबाई असा परिवार आहे.

## मराठवाडा शिक्षक संघाने उच्च माध्यमिक (शिक्षण सेवक) शिक्षकांना देखील मिळवून दिली हक्काची रजा

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय यांना दि.१८ जुलै २०२५. रोजी निवेदन दिले होत. याचा विचार करून शालेय शिक्षण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयानुसार खाजगी शाळेतील कर्मचारी यांच्यासाठी लागू केलेल्या अर्जित रजा, वैद्यकीय रजा, बालसंगोपन रजा व इतर विशेष रजा लागू राहतील असे पत्र उपसंचालक श्री प्रकाश मुकुंद यांनी दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी संघटनेच्या वेळोवेळी घेण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे देण्यात आले. यावेळी संघटनेचे महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, बाळू पवार, विनोद केनेकर, दिपक वाघ, विलास चव्हाण, विलास चांदणे, अजित जाधव, रावसाहेब बोरसे, विलास भुतेकर, डॉ. पद्माकर पगार, अजय कदम, संतोष सुरडकर, अरूणा चौधरी, सविता हिंगे, शितल कवडे, मानसी भागवत, स्वाती बोंडे, रेखा साकळे, सोनाली गव्हाणे हे उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


## भाई चंद्रकांत चव्हाण यांच्यावरील कारवाईला स्थगिती

**छत्रपती संभाजीनगर :** या न्यायालयाच्या आपण आदेशाप्रमाणे तुर्तास कुठलीही कारवाई करु नये. सत्र न्यायालय, औरंगाबाद यांनी क्रिमीनल रिव्हीजन क्रमांक १३९/२०२५ या प्रकरणात आदेश दिले. १० वी व १२ वीच्या परीक्षांच्या काळात शाळेत बेकायदेशीर प्रवेश असा आरोप करणारे परिक्षा केंद्र प्रमुख गोपाळ जगन्नाथ जाधव हे २०१८ ते २०२२ पर्यंत शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षण न घेताच बेकायदेशीर रित्या संस्था सचिव ऋषिकेश हिरालाल गतखणे व अध्यक्षा श्रीमती दुर्गा हिरालाल गतखणे यांच्या वरदहस्तामुळे मनमानी बेकायदेशीर नियमबाह्यपणे शालेय प्रशासण चालवत होते.

तसेच शिक्षण विभागाने सदरील व्यक्तीला प्राचार्य या पदाची मान्यता देखील दिलेली नाही असे असतांना गोपाल जाधव हे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या तिन्ही शाळांचे कामकाज बेकायदेशीर रित्या करत आहेत.

हे कोर्टाच्या लक्षात आणून दिल्यानंतर तसेच भरारी पथक शाळेवर गेले असता शाळेतील केंद्र संचालक व अपात्र प्राथमिक शाळेतील काही शिक्षक याठिकाणी आढळून आले. परीक्षेमध्ये गैरप्रकार होत असल्याचे आढळून आल्यानंतर भरारी पथकाच्या प्रमुखांनी केंद्र संचालक गोपाल जाधव व या संस्थे अंतर्गत अंशतः अनुदानीत प्राथमिक शाळेतील सहशिक्षक योगेश मानसिंग राठोड, विलास उत्तम वैद तसेच इतर प्राथमिक शाळेतील सहशिक्षक प्रसाद भरत महाडिक, पोचिराम गोविंदराव गवळे, सय्यद सरवर सय्यद मुनवर यांच्यावर हर्सुल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली.

हे जेव्हा भाई चंद्रकांत चव्हाण यांचे ज्येष्ठ विधिज्ञ वकील तथागत कांबळे, प्रशांत गिरी आणि परीक्षांच्या काळात चंद्रकांत चव्हाण यांच्या बेकायदेशीर प्रवेश आरोपाच्या बाबतीत गुन्हा दाखल करण्याच्या आदेशाला अखेर स्थगिती देण्यात आली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १४ सप्टेंबर २०२५

# राष्ट्रीय पालक विश्रांती दिन : पालकांच्या त्यागाला विश्रांतीचा सन्मान

मानवजातीच्या उत्क्रांतीत कुटुंबसंस्था ही सर्वात प्राचीन, शाश्वत आणि मूलभूत संस्था मानली जाते. समाजशास्त्रज्ञांच्या मते कुटुंब हेच समाजाचे मूलभूत एकक आहे, ज्यातून संस्कृती, परंपरा, सामाजिक मूल्ये, आचार-विचार आणि भावनिक बंध तयार होतात. समाजाचे शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत अस्तित्व टिकवून ठेवण्यामागे कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या कुटुंबसंस्थेचे प्रमुख स्तंभ म्हणजे पालक आहेत. आई-वडील हे केवळ मुलांना जन्म देणारे नसतात, तर ते त्यांच्या आयुष्याचे पहिले शिल्पकार असतात. आई-वडील हेच मुलांच्या संगोपनाचे, संस्कारांचे आणि सुरक्षिततेचे प्राथमिक आधारस्तंभ आहेत. मुलांच्या संगोपनात, शिक्षणात, संस्कारांत, करिअरच्या प्रवासात, विवाह व स्थैर्य मिळविण्यात पालक सतत मुलांच्या पाठीशी उभे राहतात. त्यांचा त्याग, कष्ट आणि समर्पण अमूल्य असते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे मुलांमध्ये चारित्र्य, जबाबदारीची जाणीव, संस्कृतीची परंपरा आणि समाजाशी जोडलेले मूल्य विकसित होतात. मात्र, या अखंड प्रयत्नांच्या प्रवास प्रक्रियेत पालक अनेकदा स्वतःचा त्याग करतात, आपली स्वप्ने बाजूला ठेवतात, स्वतःच्या आयुष्याकडे, आरोग्याकडे, विश्रांतीकडे दुर्लक्ष करतात आणि आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी समर्पित करतात. म्हणूनच पालकांच्या या त्यागाची जाणीव करून देत त्यांच्या आरोग्याला, मानसिक समाधानाला आणि सामाजिक योगदानाला सन्मान देण्यासाठी 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' ही संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाची ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टीने विश्रांतीचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. विश्रांती म्हणजे फक्त शारीरिक आराम नव्हे, तर मानसिक शांतता, आत्मपरीक्षणाची संधी, निसर्गाशी संवाद, छंद जोपासणे आणि भावनिक ऊर्जेचा पुनर्भरण हा त्याचा व्यापक अर्थ आहे. पालकांच्या आयुष्यातील दैनंदिन जबाबदाऱ्या इतक्या प्रखर असतात की त्यांना हे अनुभवायला वेळ मिळत नाही. परिणामी अनेकदा त्यांचे आरोग्य बिघडते, मानसिक तणाव वाढतो, कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी जर समाजाने पालकांना विश्रांतीचा दिवस दिला, तर तो त्यांच्यासाठी नव्या ऊर्जेचा श्वास ठरेल. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती काही सामाजिक भूमिका पार पाडत असतो. पालकत्व ही अशी भूमिका आहे जी इतर सर्व भूमिकांपेक्षा अधिक व्यापक, गुंतागुंतीची आणि आजीवन असते. जन्मापासून ते प्रौढत्वापर्यंत मुलांच्या प्रत्येक टप्प्यावर पालकांची नवी जबाबदारी निर्माण होत राहते. मुलांचे शिक्षण, संस्कार, सुरक्षितता, रोजगारासाठीचे मार्गदर्शन, विवाह, सामाजिक प्रतिष्ठा या सर्व टप्प्यांवर पालकांचे श्रम सतत गुंतलेले असतात. या श्रमांमध्ये विश्रांतीसाठी जागा अनेकदा राहत नाही. त्यामुळे 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा पालकांच्या भूमिकेला सामाजिक मान्यता देणारा आणि त्यांच्या थकव्याला समजून घेणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

आधुनिक जगात पालकांवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. शहरी जीवनशैलीत सकाळपासून रात्रीपर्यंतच्या धकाधकीत नोकरी, वाहतूक कोंडी, घरगुती कामे, मुलांच्या अभ्यासाची काळजी, आर्थिक नियोजन आणि सामाजिक जबाबदाऱ्या यामुळे पालकांच्या अंगावर दुप्पट ताण येतो. ग्रामीण भागात शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी आणि पारंपरिक सामाजिक अपेक्षा या कारणांनी पालकांची झुंज अखंड सुरू असते. अशा परिस्थितीत पालकांना एक दिवस जाणीवपूर्वक विश्रांती देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याला आणि मानसिक शांतीला नवा श्वास देणे होय. एक दिवस पालकांना दिलेली विश्रांती ही कुटुंबातील परस्पर सहयोगाची निशाणी आहे. मुलांनी एका दिवसासाठी पालकांची कामे आपल्या अंगावर घेतली, तर त्यांना पालकांच्या कष्टांची खरी जाणीव होईल. हे केवळ घरापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजातील एकात्मतेलाही बळकटी देते. यामुळे पालकांबद्दल आदर, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना मुलांच्या मनात अधिक दृढ होते. परिणामी, कुटुंबातील बंध अधिक घट्ट होतात आणि समाजातील परस्पर समन्वयही दृढ होतो. सतत श्रम करणाऱ्या व्यक्तीला आपल्या कार्याचे महत्त्व उमजेनासे होते आणि त्याला स्वतःपासून व समाजापासून वेगळे वाटू लागते. पालकांचे श्रमदेखील अनेकदा अदृश्य श्रम असतात. आईच्या घरगुती कामांना पगार नसतो, तर वडिलांच्या कष्टांनाही अनेकदा केवळ 'कर्तव्य' म्हणून पाहिले जाते. अशा परिस्थितीत 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' पालकांच्या अदृश्य श्रमांना मान्यता देतो, त्यांचा सन्मान करतो आणि त्यांना त्यांच्या सामाजिक योगदानाची जाणीव करून देतो.

आरोग्याच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत उपयुक्त आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, ताण, चिंता, नैराश्य, हृदयरोग यांसारख्या समस्या पालकांमध्ये वाढत आहेत. यामागे सततची जबाबदारी, आर्थिक ओझे आणि विश्रांतीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. पालकांचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम थेट मुलांच्या विकासावर व कुटुंबाच्या स्थैर्यावर होतो. त्यामुळे पालकांना विश्रांती देणे म्हणजे कुटुंबाच्या आरोग्याचे व समाजाच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण करणे आहे.

लिंगभावसमतेच्या दृष्टिकोनातूनही या दिवसाचे महत्त्व मोठे आहे. भारतीय समाजात अजूनही आईवर घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा जबाबदाऱ्यांचा डोंगर असतो. वडील घराबाहेर कष्ट करून आर्थिक भार पेलतात. या दोन्ही भूमिकांचा सन्मान करणे आणि विश्रांतीद्वारे त्यांना समान आधार देणे ही गरज आहे. 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' या संकल्पनेतून घरगुती कामांचे वाटप, जबाबदाऱ्यांचा समतोल आणि परस्पर सहकार्याची जाणीव वाढीस लागते. यामुळे लिंगभावभेद कमी होतो आणि समतेच्या मूल्यांना बळकटी मिळते.

तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात मुलांची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यांत गुंतलेल्या मुलांना पालकांच्या त्यागाची खरी जाणीव होत नाही. या पार्श्वभूमीवर अशा दिवसांचे महत्त्व अधिक वाढते. मुलांनी पालकांसाठी स्वयंपाक करणे, घराची साफसफाई करणे, त्यांच्या छंदांमध्ये वेळ घालवणे किंवा फक्त त्यांच्यासोबत संवाद साधणे यामुळे पालकांना मानसिक समाधान मिळते आणि मुलांमध्ये जबाबदारीची जाणीवही दृढ होते. या दिवसाचे औपचारिकतेत रूपांतर न होता तो खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ होण्यासाठी शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि माध्यमे यांनी पुढाकार घ्यायला हवा. शाळांमध्ये पालकांविषयी कृतज्ञतेची निबंध स्पर्धा, वादविवाद, नाटिका यांचे आयोजन करता येईल. स्वयंसेवी संस्थांनी पालकांचा सन्मान करणारे कार्यक्रम घ्यावेत. माध्यमांनी पालकांच्या संघर्षांच्या प्रेरणादायी कथा समाजापर्यंत पोहोचवाव्यात. यामुळे समाजात पालकांविषयी आदराची जाणीव वाढेल आणि 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' एक व्यापक चळवळ बनेल. समाजशास्त्रज्ञांच्या मते, कुटुंबसंस्था ही समाजाच्या प्रगतीची पायाभूत रचना आहे. पालक हे त्या रचनेचे प्रमुख स्तंभ आहेत. त्यांना विश्रांती देणे म्हणजे या स्तंभांना बळकट करणे आणि समाजाच्या भविष्यासाठी मजबूत पाया घालणे होय. म्हणून 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस केवळ एक उत्सव नाही, तर पालकत्वाचा गौरव करणारा, मूल्यांचा पुनर्विचार घडवणारा आणि सामाजिक ऐक्याला बळकट करणारा उपक्रम आहे.

आजच्या वेगवान जीवनात पालकांना स्वतःसाठी वेळ काढणे फार कठीण झाले आहे. ते मुलांच्या भविष्यासाठी झटत असतात, स्वतःच्या इच्छा-आकांक्षा अनेकदा बाजूला ठेवतात. त्यामुळे त्यांना एक दिवसाची विश्रांती देणे ही केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आहे. पालकांचे समाधान, त्यांचे आरोग्य आणि आनंद यातूनच मुलांचे सुरक्षित बालपण, कुटुंबातील ऐक्य आणि समाजाची प्रगती घडते. म्हणूनच 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस पालकांच्या त्यागाचा सन्मान करणारा, कुटुंबसंस्थेचा उत्सव साजरा करणारा आणि भावी पिढ्यांना कृतज्ञतेचा अमूल्य धडा शिकवणारा ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
**bagate.rajendra४@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002